# प्रेस नोट ता. १६/०७/२०१९

## रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक

हडपसर पोलीस स्टेशन हददीत वाहनचोरीच्या गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलींग संदर्भात मा. वरिष्ठांचे आदेशान्वये पो.हवा. ३८६८ औचरे, पो.ना. ५८५३ दळवी, पो.शि.१०१५ कुसाळकर असे हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत फिरत फिरत कवडीपाट टोल नाक्या जवळ पुणे सोलापूर हायवे रोडवर पुणे येथे वाहन चेकींग करीत असताना एका ॲटो रिक्षा नं. एम.एच. १२ जे.एस. ९९०३ हिस थांबण्याचा इशारा केला असता तो न थांबता पळुन जावु लागला. तेव्हा लागलीच वरील स्टाफ यांनी त्या ॲटो रिक्षाचा पाठलाग करुन, थोडयाच अंतरावर थांबवुन ॲटो रिक्षा चालक गोविंद हनुमंत घोडके, वय १९ वर्षे रा. मु.पो. वासवाडी, पाकर सांगवी, ता. जि. लातुर यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यात मिळुन आलेल्या ॲटो रिक्षाबाबत तपास केला असता त्याने सदरची ॲटो रिक्षा चोरल्याचे सांगितले. त्यामुळे त्याला हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ५५१/२०१९ भादविक ३७९ या गुन्हयात दिनांक १३/०७/२०१९ रोजी १८.०५ वाजता अटक करण्यात आली आहे.

अटक मुदतीत आरोपी नामे गोविंद हनुमंत घोडके यास अधिक विश्वासात घेवुन तपास केला असता हडपसर गावात त्याचे समोर एक रिक्षा येवुन थांबली व त्यातील चालक हा पैसे सुटटे करण्याकरीता दुकानात गेला असताना त्या रिक्षामधील गि-हाईकास बाहेर येण्याचे सांगुन रिक्षा चालकाची नजर चुकवुन ॲटो रिक्षा चोरुन नेली असले बाबत सांगितले. गुन्हयातील चोरीस गेलेली ॲटो रिक्षा नं. एम.एच. १२ जे.एस. ९९०३ ही जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो.हवा. ३८६८ सपंत औचरे, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.